माहितीचा अधिकार

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdrcamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

जा.क्र.: विकाअ/आस्था/२०२६/ 1923 दिनांक :- 20 JUL 2026

प्रति,

प्राचार्य,
सर्व विना-अनुदानित / कायम विना अनुदानित पदविका व पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- विना-अनुदानित / कायम विना अनुदानित संस्थांच्या सरळसेवा बिंदुनामावलीची अंतिम तपासणी करणेबाबत

संदर्भ :- १. शासन पत्र क्र. उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकिर्ण-२०२६/ई.९२६६६८/विशि-१. दि. १७/०६/२०२६
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/बिंदु नामावली/२०२६/ DTEM-D२/७५/२०२६-DESK२, दि. २५/०६/२०२६

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०७/०४/२०२२ रोजीच्या अधिसुचनेन्वये "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१" अधिसुचित करण्यात आला आहे. तसेच, सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत शासनाच्या दि. २४/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण देखील निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील विना अनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील पदांना आरक्षण धोरण लागू नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तरी देखील काही विनाअनुदानित / कायम अनुदानित संस्था / महाविद्यालयांकडून बिंदूनामावली प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांचे अभिप्राय घेण्यात आले आहेत. त्यानुसार या दोन्ही विभागाकडून "उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विना-अनुदानित/कायम विना अनुदानित संस्थांना / महाविद्यालयांना "महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१" मधील तरतुदी लागू होत नाही" असे कळविण्यात आले आहे.

सदर बाब शासनाने संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये कळविली असून, ती संबंधित संस्था / विद्यापीठे / कार्यालये यांच्या निदर्शनास आणण्याबाबत ही कळविले असल्याचे संदर्भ क्र. २ चे पत्रान्वये निर्देशित केले आहे.

करीता या विभागातील सर्व विना अनुदानित/कायम विना अनुदानित संस्था/महाविद्यालयांच्या/कार्यालयांच्या/ विद्यापीठाच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

प्रत :- १) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन क्र. २) यांना माहितीकरीता सादर.
३) शिक्षण विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहितीकरीता.